महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**औषध निरीक्षक, गट – ब, अन्न व औषध प्रशासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

दिनांक – १३ मे, २०२२

---

फाईल क्रमांक – १०११/८२४२/अठ्ठावीस
जाहिरात क्रमांक – ११/२०१५ व १२/२०१५

मागणीपत्राचा दिनांक – ४ डिसेंबर,२०१३
मुलाखतीचा दिनांक – १ व २ जून, २०१६
व दि.१४ ऑगस्ट,२०१९

---

विज्ञापीत पदे व आरक्षण -

जा.क्र.११/२०१५ चालू रिक्त – एकूण १९ पदे - अमागास –७ + ३*+१☑,अ.जा. १+१*,अ.जा.-१,वि,जा.(अ)-१,

भ.ज.(क)-१,इ.मा.व.-२+१*

जा.क्र.१२/२०१५ अनुशेष – एकूण १६ पदे - अ.जा.- ३+१*,अ.ज.- ५+२*+१☑,भ.ज.(क)-१,इ.मा.व.-१,वि,मा.प्र.-२

( *उपलब्ध असल्यास महिलांसाठी राखीव, ☑ खेळाडूकरीता राखीव)

---

## सुधारित निकाल

१. श्री.अमोल काकासाहेब लेकुरवाळे यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक १२१८/२०१३ प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक १२ फेब्रुवारी,२०१६ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार ०५ पदे रिक्त ठेवण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार उपरोक्त दोन्ही जाहिरातींमधील एकूण ३५ पदांपैकी अमागास वर्गवारीची ०५ पदे रिक्त ठेवण्यात येवून उर्वरित ३० पदांचा निकाल दि. २१ मे,२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आला होता.

२. उपरोक्त नमूद रिट याचिका मा. उच्च न्यायालयाने दि १८ फेब्रुवारी,२०२२ च्या आदेशान्वये निकाली काढली. त्यामुळे रिक्त ठेवण्यात आलेल्या अमागास प्रवर्गाच्या ०५ पदांवर उमेदवारांची शासनाकडे नियुक्तीसाठी शिफारस करणे आवश्यक आहे. या ०५ पदांवर शिफारस करताना यापूर्वीच्या निकालात बदल होत आहे. सुधारित निकाल नुसार शिफारस पात्र उमेदवारांची यादी सोबत सादर केली आहे. सदर निकालानुसार अनुक्रमांक ०६ श्री. देशमुख प्रविण पझाकर, अनुक्रमांक १० श्री. शिंदे शिवाजी मारुती, अनुक्रमांक १४ श्री. तांदळे मंथन योगिराज. अ.क्र. २२ श्री. घुले ऋषिकेश शांताराम हे ४ उमेदवार शिफारस पात्र ठरत आहेत.

३.	तसेच ०५ खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांवर शिफारस करण्यासाठी सुधारित करण्यात आलेल्या निकालामध्ये यापूर्वीच्या निकालातील भ.ज. (क) प्रवर्गातून शिफारस पात्र ठरलेले श्री. संदिप बाबासाहेब दातीर हे खुल्या प्रवर्गातून शिकारस पात्र ठरत आहेत. परिणामत: भ.ज (क) प्रवर्गातील अन्य उमेदवार उपलब्ध नसल्याने त्या प्रवर्गाच्या पदावर उमेदवारांची शिफारस करणे आयोगास शक्य झाले नाही,

४.	अ.जा. वर्गवारीच्या एका पदाकरीता, इ.मा.व.(अनुशेष) वर्गवारीच्या एका पदाकरिता, तसेच अ.ज. वर्गवारीच्या ०८ पदांकरीता (चालु रिक्त पदे-१, अनुशेष-४ पदे, अ.ज. (महिला) (अनुशेष) –२ पदे व अ.ज. (खेळाडू) अनुशेष -०१ पद) अशा एकूण १० पदांवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने या १० पदांवर उमेदवारांची शिफारस करणे आयोगास शक्य झाले नाही.

५.	जा.क्र.११ व १२/२०१५ या दोन्ही जाहिरातींचा निकाल एकत्रितपणे तयार करण्यात आला असून गुणवत्तेनुसार चालू पदे व अनुशेषाची पदे एकत्रित विचारात घेऊन भरण्यात येत आहेत. सदर दोन्ही जाहिरातींसाठी चाळणी परिक्षेचा निकाल स्वतंत्र तयार केला असल्याने त्या त्या जाहिरातीमधील विविध वर्गवारीच्या पदांसाठी निश्चित केलेल्या चाळणी परीक्षेच्या गुणांच्या सीमारेषेनुसार उमेदवारांचा विचार करण्यात आला आहे.

६.	शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या सर्व प्रमाणपत्रांबाबतची सत्यासत्यता तपासुन व अनुभव प्रमाणपत्रांची पडताळणी करुन प्रस्तुत पदाच्या जाहिरातीमधील मुददा क्र. ४.६ येथील विहीत अनुभव धरण करत असल्याची खात्री पटल्यानंतरच त्यांच्या सदर पदावरील नियुक्तीबाबतचा निर्णय घेण्याच्या अटीच्या अधिन राहून शासनाकडे त्यांची शिफारस करण्यात येत आहे.

७.	शिफारसपात्र ठरलेल्या उमदेवारांची शिफारसपत्रे त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

८.	शिफारसपात्र उमेदवारांनी आयोगाचे शिफारसपत्र मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाहीसाठी शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग ( औषधे-१), ९ वा मजला, गो. ते. रुग्णाालय संकुल इमारत, मुंबई-४००००२ या विभागाशी संपर्क साधावा.

उपसचिव (निकाल),

महाराष्ट्र लोकसेवा आयोग.